कौ.हिं.ख.क. ०१/२०१८.
सौ. मिना +४ -वि- सोनकुमार

## निशाणी ०३ वरील आदेश

(०६.०४.२०१८ रोजी पारीत)

अर्जदार क. १ हिने गैरअर्जदारांविरूध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम १२ सहकलम १७ ते २० व २२ (थोडक्यात "अधिनियम, २००५") अन्वये अर्ज दाखल केला आहे व प्रस्तूतच्या अर्जाव्दारे अंतिम निकालापर्यंत गैरअर्जदार याच्या विरूध्द अंतरिम मासीक आर्थिक सहाय्य म्हणून अर्जदार क. १ ते ५ करीता संयुक्तरित्या दरमहा रक्कम रू. ८,०००/- ची मागणी केलेली आहे.

२. कथनांची वारंवारीता टाळण्याकरीता अर्ज निशाणी ०३ मधील कथनांचा उल्लेख येथे सविस्तर घेण्यात येत नाही.

३. अर्जदाराचा अर्ज निशाणी ०३, अर्ज निशाणी ०१, प्रतिज्ञापत्र निशाणी ०४ वाचले आहे. अर्जदारातर्फे दाखल कागदपत्र पाहिले आहेत. जाबदाराचे मुळ अर्जाला व निशाणी ३ च्या अर्जाला दिलेले म्हणणे निशाणी १३ वाचले आहे. अर्जदार व गैरअर्जदारांतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला आहे. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयासाठी पुढील मुदद्े विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमुद कारणांकरीता नोंदविण्यात येत आहे.

| अ.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार व जाबदार यांच्यामध्ये प्रथम दर्शनी कौटुंबीक संबंध असल्याचे अर्जदार सिध्द करते काय? | ...होकारार्थी |
| २ | गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कौटूंबीक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होत आहे काय? | ...होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३ | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे दरमहा अंतरिम आर्थिक सहाय्य मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय? | ...अंशतः होकारार्थी |
| ४ | आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## **कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ करीता :**

४. अर्जदार व जाबदार यांच्यामध्ये कौटुंबीक संबंध आहेत काय, हे पाहणे महत्वाचे आहे. *अधिनियम २००५ मध्ये कलम २(फ) नुसार कौटूंबीक संबंध म्हणजे दोन व्यक्तींमधील संबंध, ज्या व्यक्ती एका घरात राहत आहेत किंवा कोणत्याही क्षणी एका घरात राहत होत्या, जेव्हा त्या व्यक्ती लग्न अथवा लग्नासारख्या संबंधाने किंवा दत्तक विधानाने एका घरात राहत असतील किंवा एकत्र कुटूंबाच्या सदस्य असतील.*

५. अर्जदार मिनाच्या कथनानुसार, सोनकुमार सोबत तिचा विवाह आदिवासी समाजाच्या चालि-रितीरिवाजाप्रमाणे २००५ साली झालेला आहे व वैवाहीक संबंधातुन अर्जदार क. २ ते ५ जन्माला आलेले आहेत. जाबदाराने अर्जदारांसोबतचे नाते संबंध मान्य केले आहेत. म्हणजेच अर्जदार क. १ व जाबदार यांच्यातील वैवाहीक संबंध कायम असून ते अंबाडी या गांवी एका घरात राहत होते हे प्रथम दर्शनी स्पष्ट होते. यास्तव मुददा क. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यिात येतो.

**मुददा क. २ करीता :**

६. अर्जदार व जाबदार यांच्यामध्ये प्रथम दर्शनी कौटूंबीक संबंध दिसतात. निशाणी ३ व निशाणी १ च्या अर्जातील कथनांआधारे व निशाणी ४ च्या प्रतिज्ञापत्राआधारे प्रथम दर्शनी असेही स्पष्ट होते की, जाबदाराने जमुना या बाईला पत्नी म्हणून आणले आहे व ती जाबदारासोबत अंबाडी येथे राहत आहे. तसेच

जाबदार हा अर्जदार मिनावर संशय घेतो, तिला मारहाण करतो व दारूच्या नशेत जिवे मारण्याची धमकी देतो.

७. अर्जदाराच्या अर्जातील इतर कथने पाहता, दुस-या स्त्रिशी संबंध ठेवणे, अर्जदारावर संशय घेणे, तिला दारूच्या नशेत मारहाण करणे, जिवे मारण्याची धमकी देणे, याबाबी प्रथम दर्शनी निश्चितच अर्जदाराप्रती कौटूंबीक हिंसाचार आहे. सबब मुदद् क. २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**<u>मुदद् क. ३ करीता</u> :**

८. अर्जदार क. १ ने स्वतःकरीता व अर्जदार क. २ ते ४ करीता संयुक्तरित्या दरमहा रक्कम रू. ८,०००/- इतके आर्थिक सहाय्य मागीतले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार जाबदार क. १ कडे ५ एकर ओलीताची शेती असून शेतीपासुन त्याला दरवर्षी रू. ५,००,०००/- ते ८,००,०००/- उत्पन्न होते. मात्र ही कथने प्रथम दर्शनी सिध्द करण्याकरीता अर्जदारांनी कोणतेही कागदपत्रे अथवा शेतीचे उतारे हजर केलेले नाहीत.

९. अर्जदारांचे असेही कथन आहे की, जाबदार हा ट्रॅक्टरचा चालक असून त्यास ३००/- रूपये रोज मिळतो. जाबदारांनी सदर कथन नाकारलेले असले तरीही जाबदार नेमके काय काम करतो व त्याला नेमके किती उत्पन्न आहे याबाबत काहीही कथन केलेले नाही. जाबदार हा धडधाकट इसम आहे. जाबदार हा मजुरी करून उत्पन्न नक्कीच कमावु शकतो असे प्रथम दर्शनी स्पष्ट होते. या परिस्थितीत पुरूष मजुरास मिळाणारा रोज रक्कम रू. ३००/- व महिन्यातील २५ दिवस काम ही बाब लक्षात घेतली तर जाबदार यास दरमहा रक्कम रू. ७,५००/- उत्पन्न आहे असे प्रथम दर्शनी दिसते. या रकमेतुन रक्कम रू. २,५००/- ही १/३ रक्कम जाबदार करीता शिल्लक ठेवल्यास तो अर्जदार क. १ ते ५ करीता दरमहा प्रत्येकी रक्कम रू. १,०००/- मासीक आर्थिक सहाय्य

म्हणून नक्कीच देवू शकतो असे प्रथम दर्शनी दिसते. यास्तव मुदद्ा क. ३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येतो व पुढील प्रमाणे अंतरिम आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्जदाराचा निशाणी ३ चा अर्ज पुढील प्रमाणे अशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार ने अर्ज दाखल दिनांकापासून मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत अर्जदार क. १ ते ५ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रू. १,०००/- (अक्षरी रू. एक हजार) म्हणजेच संयुक्तरित्या दरमहा रक्कम रू. ५,०००/- (अक्षरी रू. पाच हजार) अंतरीम मासीक आर्थिक सहाय्य दयावे.

३. आदेशाची प्रत अर्जदार व जाबदार यांना मोफत देण्यात यावी, तसचे माहिती करीता संरक्षण अधिकारी व संबंधीत पोलीस स्टेशन यांना पाठविण्यात यावी.

धारणी.
दिनांकः ०६.०४.२०१८.

(एम.एस. गाडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
धारणी.